**पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय**

**मिल कॉर्नर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर**

**पिन-४३१००१. दुरध्वनी क्रमांक ०२४०-२२४०५९१**

**ई-मेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in**

**जा.क्र.विशा-५/आदेश/२०२५- ५६९ छत्रपती संभाजीनगर, दिनांक २२ /०१/२०२५**

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश

**आदेश :-**

**ज्या** अर्थी माझे असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये आगामी काळात सण, उत्सव साजरे करण्यात येणार असुन तसेच विविध राजकीय पक्ष व संघटनातर्फे त्यांच्या निरनिराळया मागण्यांच्या तसेच इतर विषया संदर्भात खालील नमुद प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दिनांक २४/०१/२०२५ रोजी राष्ट्रीय बालिका दिवस आहे.

दिनांक २६/०१/२०२५ रोजी प्रजासत्ताक (गणराज्य) दिन आहे.

दिनांक २८/०१/२०२५ रोजी लाला लजपतराय यांची जयंती आहे.

दिनांक ०४/०२/२०२५ रोजी जागतिक सुर्यनमस्कार दिन आहे.

दिनांक २४/११/२०२४ रोजी संबल राज्य उत्तरप्रदेश येथे शाही जामा मस्जितीच्या सर्वेक्षणादरम्यान हिंसाचार झाला होता त्याअनुषंगाने प्रक्षोभक संदेश सोशल मिडीयावर व्हायरल केले गेले आहे त्याकरीता विविध पक्ष व मुस्लिम संघटना यांच्या कडुन आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

मराठा समाजास आरक्षण मिळावे, कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी मराठा समाज, राजकीय पक्ष/संघटनेच्या वतीने धरणे, उपोषण, मोर्चे व निदर्शने इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण देण्यात येवु नये या मागणीसाठी ओबीसी समाज, राजकीय पक्ष/संघटनेच्या वतीने धरणे, उपोषण, मोर्चे व निदर्शने इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

धनगर/मुस्लीम समाजास आरक्षण मिळावे त्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष/संघटनांकडून आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेत झालेल्या आर्थिक घोटाळ्याच्या अनुषंगाने ठेवीदार संघर्ष कृती समिती तसेच इतर राजकीय पक्ष, संघटनेच्या वतीने धरणे, मोर्चे व निदर्शने इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

औद्योगिक तसेच इतर संघटीत/असंघटीत कामगार संघटनांकडून त्यांच्या विविध मागण्या संदर्भात आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगर शहर हे संवेदनशिल असल्याने कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता अबाधीत राहावी म्हणुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागु करणे जरुरीचे वाटते.

वरील कारणामुळे कोणताही अनुचित प्रकार घडु नये आणि सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून **मी प्रविण पवार, पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर** असे आदेशीत करीत आहे की, छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ति व्यतिरिक्त अन्य कोणत्याही ठिकाणी अथवा त्याचे जवळपास कोणत्याही व्यक्तीस-

(अ) शस्त्रे, सोटा, तलवार, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या किंवा लाठ्या, किंवा धार्मिक सण, उत्सव, मिरवणुक, मोर्चा, निदर्शने, आंदोलनात लोखंडी, स्टीलचे धातुने बनवलेले पाईप अथवा दुचाकी सायलन्सर चा वापर करुन गावठी पद्दतीने (सुतली बॉम्ब ) फोडण्यासाठी बंदुक तयार करुन ती सार्वजनिक ठिकाणी वापरली असता मानवास व पशुपक्षी यांना गंभीर इजा होवु शकते. असा प्रकारचे लोखंडी, स्टीलचे धातुने बनवलेले पाईप अथवा दुचाकीचे सायलन्सर चा वापर करुन गावठी पध्दतीने (सुतली बॉम्ब) फोडण्याची बंदुक वापरण्यास या आदेशाद्वारे मनाई करण्यात येत आहे. तसेच शारिरीक इजा करण्यासाठी वापरला जाऊ शकेल अशी इतर कोणतीही वस्तु जवळ बाळगता येणार नाही, तयार करता येणार तसेच वापरता येणार नाही.

(ब) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ सोबत बाळगता येणार नाही.

(क) दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची साधने बाळगु नये,जमा करू नये किंवा तयार करता येणार नाही.

(ड) कोणत्याही व्यक्तिची प्रतिमा अथवा प्रेते किंवा आकृत्या यांचे प्रदर्शन करता येणार नाही.

(इ) जाहीरपणे घोषणा करू नये, गाणे किंवा त्यांचे ध्वनिमुळे सार्वजनिक शांतता भंग होणार नाही असे ध्वनिक्षेपण करू नये.

(फ) अशा प्राधिकाऱ्यांच्या मते ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धक्का पोहचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये राज्य उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेश पुर्ण भाषणे करू नये, सोंग अगर हावभाव करू नये, आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणतीही जिन्नस किंवा वस्तु तयार करू नये, त्याचे प्रदर्शन करू नये किंवा त्यांचा जनतेस प्रसार करता येणार नाही.

तसेच आणखी असेही आदेशीत करीत आहे की, संपूर्ण छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय हद्दीत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमण्यास, निदर्शने, धरणे, मोर्चा, मिरवणुक काढण्यास मनाई करण्याचा आदेश देत आहे. हा आदेश अत्यंविधी, विवाह समारंभ आणि कर्तव्यावरील कोणतेही पोलीस अधिकारी/अंमलदार किंवा शासकीय कर्मचारी तसेच पोलीस उप आयुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, आणि पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी दिलेल्या परवानगी नुसार घेतलेल्या कार्यक्रमांना हा आदेश लागु होणार नाही.

**सदरचा आदेश छत्रपती संभाजीनगर, पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक २४/०१/२०२५ चे ००.०१ वाजेपासून ते दिनांक ०७/०२/२०२५ चे २४.०० वाजे पावेतो लागु राहील.**

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास उल्लंघन करणारी व्यक्ती ही महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही आमचे अधिनस्थ परिमंडळाचे सर्व पोलीस उप-आयुक्त, विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच सर्व शाखा प्रभारी अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहोत.

मी पुढे असेही नमुद करतो की, सदरच्या आदेशाची नोंद ही कार्यालयीन राजपत्रात समाविष्ट करण्यात येईल किंवा छत्रपती संभाजीनगर,पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील दर्शनीय ठिकाणी चिटकावून ध्वनिक्षेपकाद्वारे जाहीर करण्यात येईल.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्यानिशी आज **दिनांक** २२ **/०१/२०२५** रोजी काढण्यात आला आहे.

COMMISSIONER OF POLICE CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

**प्रविण पवार** (भा.पो.से.)
पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर.

**महत्वाची टीप :-**

**(गॅझेट प्रसिध्दी करिता) -** १. सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) छ.संभाजीनगर.
२. सहायक संचालक (मुख्य व्यवस्थापक) शासकीय मुद्रणालय, रेल्वेस्टेशन छ.संभाजीनगर
३. जिल्हा माहिती अधिकारी छ.संभाजीनगर.

**प्रतिलिपी :-**

१. मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव
२. मा.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर
३. मा.प्रमुख मुख्य न्यायधीश, जिल्हा सत्र न्यायालय, छत्रपती संभाजीनगर
४. मा.आयुक्त,महानगर पालीका, छत्रपती संभाजीनगर
५. जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
६. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, छत्रपती संभाजीनगर.
७. केंद्र संचालक,आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर
८. उपायुक्त,राज्य गुप्तवार्ता विभाग, छत्रपती संभाजीनगर
९. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर यांना योग्य कार्यवाहीस्तव
१०.पोलीस उप आयुक्त, मुख्यालय/परिमंडळ- १ व २,छत्रपती संभाजीनगर
११.सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
१२.पो.स्टे./शाखा प्रभारी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
१/- यांनी आप आपले पो.स्टे.हद्दीत सदर आदेश दर्शनीय ठिकाणी चिटकावून जाहीर करावे.
२/- सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा,यांनी सदर माहिती सोशल मिडीया विभागास देऊन प्रेसनोट मध्ये देवुन वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करावी.
१३. सर्व पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा, छत्रपती संभाजीनगर.
१/- यांनी सदर आदेशा बाबत लाऊडस्पिकरद्वारे जनतेस माहिती द्यावी.